## * रायगड जिल्हयात "एम-पासपोर्ट पोलीस ॲप" सुविधा सुरु*

रायगड जिल्हयातील सर्व सामान्य जनतेला लवकरात लवकर पासपोर्ट मिळणे करिता "एम-पासपोर्ट पोलीस ॲप सुविधा" दिनांक 16/12/2017 रोजी पासून सुरु करण्यात आलेली आहे. नमुद "एम-पासपोर्ट पोलीस ॲप सुविधा" सुरु करणे बाबत कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमात रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.अनिल पारस्कर, अपर पोलीस अधीक्षक श्री.संजयकुमार पाटील यांचे हस्ते पासपोर्ट चे काम पाहणाऱ्या सर्व पोलीस ठाणे कर्मचारी यांना नवीन टॅब चे वाटप करण्यात आले. एम-पासपोर्ट पोलीस ॲपद्वारे टॅबवर अर्जदारांचे पासपोर्ट अर्ज पडताळणी करण्याकरिता सर्व पोलीस ठाणेकडील गोपनीय कर्मचारी यांना सदर ॲप बाबत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. पासपोर्ट अर्ज पडताळणी करण्याकरिता प्रत्यक्ष चौकशी व कागदपत्रांच्या पुर्तते करिता वेळ लागत होता परंतु आता 'एम-पासपोर्ट पोलीस ॲप सुविधेमुळे पारपत्र पडताळणी लवकरात लवकर होऊन नागरिकांचा वेळ वाचणार आहे व अर्जदार यांचे पारपत्र पडताळणी होऊन त्यांना लवकरात लवकर पासपोर्ट मिळण्यास मदत होणार आहे.

नमूद कार्यक्रमास रायगड पोलीस अधीक्षक श्री.अनिल पारस्कर, अपर पोलीस अधीक्षक श्री.संजयकुमार पाटील व सर्व पोलीस ठाणे कडील गोपनीय कर्मचारी, विशेष शाखेचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.


Galaxy J





